# बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी), नाशिक शहर

## अंगणवाडी मदतनीस पद भरती जाहिरात – २०२६

**संदर्भ :** १) महिला व बाल विकास,शासन निर्णय क्र.एबाविं-२०२२/प्र.क्र.९४/का.६/मंत्रालय,मुंबई दि.०२ फेब्रुवारी २०२३
२) महिला व बाल विकास,शासन निर्णय क्र.एबाविं-२०२२/प्र.क्र.९४/का.६/मंत्रालय,मुंबई दि.३० जानेवारी २०२५
३) मा.आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडील पत्र एबाविसेयो / अंगणवाडी/ का-७/से.म./पदभरती/२०२६-२७/२८९४ नवी मुंबई दि.०३/०७/२०२६ रोजीचे निर्देश

एकात्मिक बाल विकास सेवा योजना अंतर्गत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नाशिक शहर या प्रकल्पातील अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदासाठी खालील नमूद रिक्त असलेल्या जागा भरावयाच्या असल्याने उपरोक्त शासन निर्णय व परिपत्रकास अनुसरून सरळ नियुक्तीने **(By Nomination)** नाशिक शहरातील स्थानिक रहिवाशी असलेल्या पात्र व ईच्छुक **महिला उमेदवारांकडून दि.२०/०७/२०२६ ते दि.३१/०७/२०२६** या कालावधीत (कार्यालयीन वेळेत व सुट्टीचे दिवस वगळून) विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र | विभागाचे नाव | अंगणवाडी केंद्राचे ठिकाण | अंगणवाडी मदतनीस रिक्त पद संख्या |
|---|---|---|---|
| १ | मखमलाबाद | वैदुवाडी म्हसरूळ | ०१ |
| २ | मखमलाबाद | काकडगल्ली | ०१ |
| ३ | फुलेनगर | तीन पुतळा फुलेनगर | ०१ |
| ४ | फुलेनगर | श्रीकृष्ण मोरेमळा | ०१ |
| ५ | फुलेनगर | कातारगल्ली | ०१ |
| ६ | जुने नाशिक | मातंगवाडा | ०१ |
| ७ | जुने नाशिक | काझीगढी | ०१ |
| ८ | सातपूर | स्वारबाबानगर | ०१ |
| ९ | सातपूर | जे.पी.नगर | ०१ |
| १० | सातपूर | निगळगल्ली | ०१ |
| ११ | सातपूर | राजवाडा, सातपूर | ०१ |
| १२ | सातपूर | प्रबुध्दनगर | ०१ |
| १३ | सिडको | गुलशननगर | ०१ |
| १४ | नाशिक पूर्व | बजरंगवाडी | ०१ |
| १५ | नाशिक पूर्व | मोरेमळा, पिंपळपट्टी | ०१ |
| १६ | नाशिक रोड | बागुलनगर,देवळालीगाव | ०१ |
| | | **एकूण रिक्त पदे** | **१६** |

**अंगणवाडी मदतनीस या रिक्त पदावर नियुक्ती बाबत सर्वसाधारण अटी व शर्ती :**

अ) महिला व बाल विकास,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६/मंत्रालय,मुंबई दि.०२ फेब्रुवारी २०२३ व महिला व बाल विकास,शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६/मंत्रालय,मुंबई दि.३० जानेवारी २०२५ तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रकातील अटी व शर्ती या भरती प्रक्रियेस लागू राहतील.

ब) पात्र व ईच्छुक महिला उमेदवारांनी विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज दि.२०/०७/२०२६ ते दि.३१/०७/२०२६ (कार्यालयीन वेळेत व सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी ) प्रकल्प नाशिक शहर, जि.नाशिक यांचे कार्यालयात समक्ष सादर करणे आवश्यक आहे. (सोबत अर्जाचा नमुना जोडला आहे) उपरोक्त नमूद दिनांक व वेळेनंतर या कार्यालयामार्फत कोणतेही उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

**क) अर्जासोबत खालीप्रमाणे कागदपत्रे सादर करावी.**

**१. शैक्षणिक पात्रता:**

अंगणवाडी मदतनीस पदासाठी इयत्ता १२ वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक आहे. अर्जदाराने त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार (१२ वी, पदवीधर,पदव्युतर पदवी ,डी.एड./ बी.एड, शासकीय मान्यता संस्थेचे एम.एस.सी.आय.टी (MS-CIT), शासनाने वेळोवेळी समकक्ष ठरविलेला संगणक अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र इ. त्याची गुणपत्रके/प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. जेणेकरून उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयामधील परिशिष्ट "अ" नुसार उमेदवारास गुणांकन देण्यात येईल.

**२. वास्तव्याची अट (स्थानिक रहिवासी असणे)**

उमेदवार महिला स्थानिक रहिवाशी असावी. स्थानिक रहिवाशी म्हणजेच नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी असणे आवश्यक आहे. यासाठी रहिवाशी दाखला म्हणुन शासकिय दस्तऐवज (जसे- आधारकार्ड/मतदान ओळखपत्र/ सक्षम प्राधिकारी यांचा रहीवाशी दाखला इ.) जोडणे आवश्यक आहे.

**३. वयाची अट:**

अंगणवाडी मदतनीस या पदासाठी वयोमर्यादा किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे राहिल. तसेच विधवा उमेदवारासाठी ही वयोमर्यादा कमाल ४० वर्षे राहिल.अर्ज करणाऱ्या उमेदवाराचे वय दिनांक ३१/०७/२०२६ रोजी १८ वर्षे पेक्षा कमी व ३५ वर्षे पेक्षा जास्त नसावे. त्याकीरता शाळा सोडल्याचा दाखला / १० वी उत्तीर्ण बोर्डाचे प्रमाणपत्र / जन्म नोंद दाखल्याची सत्यप्रत जोडणे आवश्यक राहील.

**४. लहान कुटुंब :-**

लहान कुटुंब याचा अर्थ उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये.

वरील पदासाठी अर्ज करणा-या उमेदवारांस लहान कुटुंबाची अट लागु राहील. उमेदवारांस दोनपेक्षा जास्त हयात अपत्ये (दत्तक दिलेल्या अपत्यांसह) नसावीत.उमेदवाराला दोन हयात अपत्यपेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यासह) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतून तात्काळ सेवामुक्त करण्यात येईल तसेच सेवा कालावधीमध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह)असून देखील तिसरे अपत्ये झाल्यास त्याच्या सेवा समाप्त करण्यात येतील. अर्जासोबत लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. प्रमाणपत्र अर्जासोबत सादर न केल्यास तसेच चुकीची माहिती सादर केल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

**५. मराठी भाषेचे ज्ञान:-**

मदतनीस रिक्त पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान (लिहिता व वाचता येणे ) असणे आवश्यक आहे. उमेदवाराने नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहील.

**६. उमेदवार विधवा असल्यास** : पतीचे मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र जोडावे.

**७. उमेदवार अनाथ असल्यास** : संबंधित विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचेकडील प्रमाणपत्र जोडावे.

**८. मागासवर्गीय असल्यास** अर्जदार अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/इतर मागास प्रवर्ग/विमुक्त जाती/भटक्या जमाती / आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक/ विशेष मागास प्रवर्ग /सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास वर्ग मधील असल्यास त्यांना शासन निर्णयातील परिशिष्ट "अ" नुसार अतिरिक्त गुण देण्यात येतील त्यासाठी अर्जदार यांनी **सक्षम प्राधिकारी** यांच जातीचे/ जमातीचे प्रमाणपत्र/दाखला व इतर अनुषंगिक कागदपत्र सादर करणे बंधनकारक असेल.

**९. अनुभव**

अंगणवाडी सेविका/मदतनीस म्हणून कमीत कमी ०२ वर्षाचा अनुभव असल्यास ५ अतिरिक्त गुण देण्यात येतील. त्यासाठी फक्त बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे प्रमाणपत्र ग्राह्य राहील. मान्यताप्राप्त खाजगी व स्वयंसेवी,अनुदानित/ विना अनुदानित संस्थेतील कामाचा अनुभव ग्राहय धरला जाणार नाही व याबाबतचा कोणताही युक्तीवाद उमेदवाराने केल्यास त्यास अपात्र ठरविण्यात येईल.

**१०. नावात बदल असल्यास**

अर्जदाराने अर्जासोबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा दोन्ही नावे एकाच व्यक्तीचे असलेबाबत प्रतिज्ञापत्र (रु.१००/- च्या प्रतिज्ञापत्रावर) सादर करावे.

११. अंगणवाडी मदतनीस यांच्या रिक्त पदांच्या संख्येत बदल तसेच पद/जाहिरात रद्द करण्याचे अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी ) नाशिक शहर यांना राहतील.

**१२. अर्जदाराचे नांव व पदाचे नाव नमुद केलेले नसणे, अर्ज अपुर्ण भरलेला असणे, खाडाखोड असणे, उमेदवाराची विहित ठिकाणी स्वाक्षरी नसणे तसेच अर्जाच्या सोबत आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या छायांकित व साक्षांकित प्रती नसणे इ. कारणांमुळे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील व त्यासंबंधी उमेदवारांस कळविण्यात येणार नाही. अंतिम दिनांकानंतर (दि.३१.०७.२०२६ नंतर) आलेल्या किंवा डाकेने (पोष्टामुळे) विलंब झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.**

**१३. निवड कार्यपध्दती:** महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६, दिनांक.०२.०२.२०२३ व महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६, दिनांक.३०.०१.२०२५ नुसार उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवरुन इयत्ता १२वी/पदवी/पदव्युत्तर पदवी/डी.एड/बी.एड/संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र यामध्ये त्यांना मिळालेल्या गुणांनुसार तसेच विधवा/अनाथ, जात प्रवर्ग, अनुभव इ.साठी त्यांचे प्रमाणपत्रांवरुन मिळालेल्या एकुण गुणांनुसार गुणानुक्रमाने पात्र उमेदवारांची शहरातील रिक्त पदांच्या संख्येनुसार निवड करण्यात येईल. या पदांकरीता कोणतीही लेखी परिक्षा अथवा मुलाखत घेतली जाणार नाही. अर्जासोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांनुसार शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदवारांना गुण देऊन प्राथमिक गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल. त्यावर अर्ज करणा-या उमेदवारांना आक्षेप / तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारांनी १० दिवसांचे आंत लेखी तक्रार बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नाशिक शहर या कार्यालयाकडे सादर करावी. तक्रार सादर करताना सोबत तक्रारीच्या अनुषंगाने योग्य ते कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील. गुणवत्ता यादी तयार करताना सर्वात जास्त गुण असलेल्या उमेदवाराचे नाव सर्वात वर व सर्वात कमी गुण असलेल्या उमेदवाराचे नाव सर्वात खाली अश्या प्रकारे प्रसिद्ध करण्यात येईल एकापेक्षा जास्त उमेदवारांना सारखेच गुण प्राप्त झाल्यास अश्या प्रसंगी सर्वात जास्त शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवाराची निवड करण्यात येईल जर शैक्षणिक अर्हता ही समान असल्यास जास्त वय असलेल्या उमेदवाराची निवड करण्यात येईल तसेच सदर निकष लावूनही गुणवत्ताक्रम समान येत असल्यास चिठ्ठी टाकून निवड करण्यात येईल. प्राथमिक गुणवत्ता प्रसिद्ध केल्यानंतर दहा दिवसांत ज्या तक्रारी/हरकती/आक्षेप प्राप्त होतील अश्या प्राप्त तक्रारींची शहानिशा करून गुणवत्ता यादी सुधारित करण्यात येईल.

१४. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात किंवा अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती सदर प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर किंवा निवड झाल्यानंतरही रद्द करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांच्या नियुक्ती वेळी मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा निवड प्रक्रियेतुन अपात्र ठरविण्यात येईल.

१५. एखादया उमेदवाराने त्याच्या निवडीसाठी प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यांस निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल.

१६. अंगणवाडी मदतनीस यांना शासन दरानुसार दरमहा रू ७५००/- मानधन देय आहे. शासकिय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल. मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते/सवलती अनुज्ञेय नाही. अंगणवाडी मदतनीस हे एकत्रित मानधनावरील मानधनी स्वरुपाचे पद आहे.

१७.अंतिम निवड यादी जाहिर झाल्यानंतर गुणानुक्रमे मदतनीस यांची निवड करण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना नाशिक महानगर पालिका हद्दीतील कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर काम करावे लागेल.अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे अंगणवाडी कर्मचार्यानाबदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही. तसेच त्यांचे निवासस्थानापासुन नियुक्ती देण्यात आलेल्या ठिकाणापर्यंत कोणताही प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही. त्याचप्रमाणे नियुक्ती झालेल्या ठिकाणी सतत गैरहजर राहिल्यास त्यांची नियुक्ती खंडीत करणेत येईल.

**१८. प्रतिक्षा यादी:** एकुण प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारावर उमेदवारांची प्रतिक्षा यादी ठेवण्यात येईल. काही कारणामुळे उमेदवार नियुक्ती आदेशाच्या दिनाकांपासुन ३० दिवसांपर्यंत रुजु न झाल्यास किंवा त्यांस अपात्र ठरविण्यात आल्यास प्रतिक्षा यादीतील गुणानुक्रमानुसार उमेदवारांस नियुक्ती देण्यात येईल व सदर क्षेत्रात कोणत्याही कारणास्तव पद रिक्त झाल्यास अथवा नवीन पद निर्मिती झाल्यास प्रतिक्षा यादीतील उमेदवारांस गुणानुक्रमे नियुक्ती देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन एक वर्ष वैध राहील.

**१९. अपील:** अंगणवाडी मदतनीस या पदावरील घोषित निवडीसंदर्भात कोणत्याही उमेदवाराची तक्रार असल्यास निवड यादी घोषित झाल्यापासुन ३० दिवसांचे आत मा.विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडे तक्रार करता येईल व मा.विभागीय उप-आयुक्त, महिला व बाल विकास, नाशिक विभाग, नाशिक यांनी दिलेल्या निर्णयामुळे तक्रारदाराचे समाधान झाले नसल्यास मा. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांचेकडे पुढील ६० दिवसांत अपील दाखल करता येईल.

**२०. सेवा समाप्तीसाठी वयाची अट:** या शासन निर्णयान्वये नियुक्त होणा-या अंगणवाडी मदतनीस यांची सेवा वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत किंवा त्या शारीरिकदृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास यापैकी जे आधी घडेल तोपर्यंतच सुरु ठेवण्यात येईल.

**२१.** जाहिरातीमधील कोणत्याही मुद्दयाबाबत साशंकता अगर संदिग्धता निर्माण झाल्यास संबंधित शासन निर्णयातील तरतुदी अंतिम राहतील.

**२२. पत्रव्यवहार :- भरती प्रक्रियेसंबंधी अर्जदारांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीमधील अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी देण्यात येणा-या सुचना कार्यालयीन नोटीस बोर्डवर लावण्यात येतील.**

**२३. महत्त्वाची सुचना** : महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६, दिनांक.०२.०२.२०२३ व महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का-६, दिनांक.३०.०१.२०२५ नुसार सदर भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असुन निवड व नियुक्ती गुणवत्ता यादीनुसार करण्यात येणार आहे. करीता उमेदवारांनी कोणत्याही भुलथापांना अथवा अफवांना बळी पडू नये.

**२४. अर्ज सादर करण्याचा पत्ता :**

**बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) नाशिक शहर यांचे कार्यालय,**
flat no-**२, दुसरा मजला, सिल्वरमुन,ड्रिम सिटीसमोर, सहकारनगर, समर्थ रामदास स्वामी मार्ग,**
**नाशिक-४२२००६**

**२५. अर्ज स्विकारण्याचा कालावधी:** दि.२०/०७/२०२६ ते दि.३१/०७/२०२६ (कार्यालयीन वेळेत व शासकीय सुटटीचे दिवस वगळुन)

सोबत: अर्जाचा विहित नमुना
ठिकाण : नाशिक.
दिनांक : १६.०७.२०२६.

(स्वाती कलाल )
बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी),
नाशिक शहर

# -: अंगणवाडी मदतनीस पदासाठीचा अर्ज :-

उमेदवाराचे
पासपोर्ट साईझ
फोटो लावून
स्वाक्षरी करावी

**प्रति,**
मा.बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी)
नाशिक शहर.

१.अर्जदाराचे नाव कु./सौ,/श्रीमती :-.................................................................................
२.अर्जदाराचे लग्नानंतरचे नाव :- .................................................................................
अर्जदाराचे लग्नापूर्वीचे नाव :-.................................................................................
३.जन्मतारीख :-......./......./......... अक्षरी .................................................................................
दिनांक: ३१/०७/२०२६ रोजी दिनांकास उमेदवाराचे वय वर्ष............महिने...........दिवस....................
(जन्म प्रमाणपत्र/शाळा सोडल्याचा दाखला/आधार कार्ड इ.यापैकी एकाची छायांकित प्रत जोडावी)
४. आधार कार्ड क्रमांक :- .................................................................................
५.निवासी पत्ता कु/सौ./श्रीमती:-.................................................................................
.................................................................................
जि.नाशिक पिन कोड क्रमांक :- .........................
६.मोबाईल क्रमांक :- ..............................................
७.मागासवर्गीय आहात का ? :- होय/नाही
असल्यास प्रवर्ग :- ..............................................जात :-..................................
(जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे)
८.विधवा/अनाथ आहात काय ? होय/नाही
असल्यास सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

**९.शैक्षणिक पात्रता :-**

| तपशील | प्राप्त गुण | पैकी गुण | टक्केवारी | बोर्ड/विद्यापीठाचे नाव |
|---|---|---|---|---|
| इयत्ता १२ वी | | | | |
| पदवीधर | | | | |
| पदव्युत्तर | | | | |
| डी.एड. | | | | |
| बी.एड. | | | | |
| एम.एस.सी.आय.टी (MSCIT) व इतर अनुषंगिक शासनमान्य संस्थेचे प्रमाणपत्र | | | | |

१०.अवगत असलेल्या भाषा

| अ.क्र. | बोलता येणाऱ्या भाषा | वाचता येणाऱ्या भाषा | लिहिता येणाऱ्या भाषा |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

**११.अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका/मदतनीस म्हणून अनुभव आहे काय ? होय/नाही**

असल्यास खालील माहिती भरावी

अ ) अंगणवाडी सेविका/मदतनीस पदाचा अनुभव.......................................

ब ) अनुभव कालावधी :-.........................................................................

क ) अंगणवाडी केंद्राचे नाव व प्रकल्पाचे नाव :- ..................................................

**मी असे प्रमाणित करते कि,अंगणवाडी मदतनीसच्या रिक्त पदे भरण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात,शासन निर्णय व परिपत्रके मी पूर्णपणे वाचली असून त्या अनुषंगाने मी अर्जात नमूद केलेली माहिती खरी आहे.त्याचे पृष्ठर्थ मी प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडल्या आहेत.अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास मी मानधनी पदाकरिता केलेला अर्ज/नियुक्ती रद्द होईल याची मला जाणीव आहे.तसेच हे पद मानधनी तत्वावर असून केंद्र शासन व राज्य शासन यांचे शासन निर्णय व परिपत्रकास अनुसरून नियाप्रमाणे देय असलेले मानधन तसेच त्यातील अटी/शर्ती/सूचना मला मान्य राहतील.निवड प्रक्रीयेविरुद्ध तक्रार अथवा अपील दाखल झाल्यास सक्षम प्राधिकरणाने दिलेला निर्णय मला मान्य राहील.**

**ठिकाण :-**

**दिनांक :-** अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी

## -: लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र :-

मी श्री/श्रीमती/कुमारी ..................................................................................................

श्री/श्रीमती ..................................................................याची मुलगी/पत्नी वय...............................वर्षे

राहणार .......................................................................................................................

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करते कि,

१) मी अंगणवाडी मदतनीस या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला खालीलप्रमाणे अपत्ये (मुले/मुली) आहेत.

| अ.क्र. | मुलाचे/मुलीचे नाव | जन्मतारीख | वय |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

३) हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल किंवा भविष्यात दोनपेक्षा अधिक अपत्ये झाल्यास मानधनी पदासाठी मी अपात्र ठरविण्यात किंवा सेवेतून कमी करण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

४) मला दोन पेक्षा जास्त मुले होणार नाहीत याबाबत मी कुटुंब नियोजन करून घेण्याची प्रतिज्ञा घेते. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती खरी असून अर्जातील कोणतीही माहिती अथवा प्रमाणपत्र खोटे आढळून आल्यास माझी उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व माझे विरुद्ध भारतीय न्याय संहिता नुसार कारवाई करण्यास माझी हरकत नाही .

**ठिकाण :-**

**दिनांक :-**

**अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी**

## अर्जासोबत खालीलप्रमाणे कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रति जोडण्यात आलेल्या आहेत

---

१. विहित नमुन्यातील अर्ज
२. रहिवासी दाखला
३. शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र(L.C./T.C.)/ जन्म दाखला
४. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना "ब"
५. शैक्षणिक अर्हता १२ वी गुणपत्रक,पदवी,डी.एड./बी.एड.,पदव्युतर पदवी बाबत गुणपत्रक व प्रमाणपत्र शासन मान्य संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र/MS-CIT.
६. सक्षम प्राधिकारी यांचे जातीचे प्रमाणपत्र (लागू असल्यास)
७. विधवा असल्यास पतीच्या मृत्यू नोंद दाखल्यासह स्वयंघोषणापत्र (लागू असल्यास) व दुसरा विवाह न केलेबाबत वा न करणेबाबत प्रतिज्ञापत्र/स्वयं घोषणापत्र
८. अर्जदार अनाथ असल्यास सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र
९. आधार कार्ड/निवडणूक ओळखपत्र
१०.नावात बदल असल्यास रु.१०० च्या स्टॅपपेपर वर प्रतिज्ञापत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र
११. अनुभव प्रमाणपत्र (असल्यास)
१२.इतर अनुषंगिक कागदपत्रे.

**(टिप: अ.क्र १ ते १२ नुसार कागदपत्रे जोडले असल्यास होय नसल्यास नाही म्हणावे.)**

**वरीलप्रमाणे नमूद कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती अर्जासोबत जोडण्यात आलेल्या आहेत कोणतेही मूळ कागदपत्रे जोडण्यात आलेली नाहीत तसेच अर्ज कार्यालयात सादर केल्यानंतर कोणत्याही कागदपत्रे विहित दिनांक व वेळेनंतर सादर करता येणार नाहीत ह्याची मला जाणीव आहे.अर्जासोबत छायांकित प्रती जोडलेल्या आहेत.**

**दिनांक:**

**अर्जदाराचे पूर्ण नाव व स्वाक्षरी**